| वर्ष - 9 | अंक -44 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- भारताचा पाकिस्तानवर विजय!
- मुनीबा अली वादग्रस्तरित्या झाली आऊट
- हिंसेप्रकरणी चौकशीची मागणी
- भारताचा मान राखणे आवश्यक

www.mahaenews.com | सोमवार, दि. 6 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### राष्ट्रीय आपत्ती: महाराष्ट्र सरकार अलर्टवर, विक्री, वितरण व वापर त्वरीत थांबवा

# कफ सिरपमुळे देशात हाहाकार!

## मध्य प्रदेश व राजस्थानमध्ये बालकांच्या मृत्यूचा आकडा वाढला

। नवी दिल्ली / मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**देशात पुन्हा एकदा औषधांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये ‘कोल्ड्रिफ कफ सिरप’च्या सेवनानंतर अनेक बालकांच्या मृत्यूची धक्कादायक घटना घडल्याने संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. या घटनेची दखल घेत महाराष्ट्र सरकारने तात्काळ कारवाई करत सर्व जिल्ह्यांना सतर्कतेचे आदेश दिले आहेत. राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासनाने (FDA) ‘कोल्ड्रिफ सिरप’च्या वापर, विक्री आणि वितरणावर तात्काळ बंदी घालण्याचे निर्देश जारी केले आहेत.**



‘कोल्ड्रिफ सिरप’ प्रकरणामुळे देशभर औषधांच्या सुरक्षिततेबद्दल पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. बालकांच्या मृत्यूंच्या घटना ही केवळ दुर्लक्षाची नव्हे, तर संपूर्ण औषध निर्मिती प्रक्रियेतील त्रुटींची गंभीर नोंद आहे. महाराष्ट्र सरकारने घेतलेली तात्काळ कारवाई आणि जनतेस दिलेले आवाहन हे निश्चितच प्रशंसनीय आहे. मात्र भविष्यात अशा घटना होऊ नयेत यासाठी औषध उत्पादन, तपासणी आणि विक्रीवरील नियंत्रण प्रणाली अधिक कडक करणे अत्यावश्यक ठरते.

### कफ सिरपमुळे मृत्यूंची मालिका, देशभर चिंता

मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर आणि राजस्थानातील कोटा या ठिकाणी गेल्या काही दिवसांत काही बालकांनी ‘कोल्ड्रिफ सिरप’ घेतल्यानंतर प्रकृती बिघडून मृत्यू झाल्याची प्रकरणे समोर आली आहेत. प्राथमिक तपासात या सिरपमध्ये ‘डायथिलीन ग्लायकोल (DEG)’ नावाच्या घातक रासायनिक पदार्थाचे प्रमाण आढळल्याचे स्पष्ट झाले आहे. हा रासायनिक पदार्थ मानवाच्या शरीरासाठी अत्यंत विषारी आहे आणि याचा प्रभाव मूत्रपिंड, यकृत तसेच मेंदूवर होतो.

या घटनेनंतर केंद्र सरकारनेही सर्व राज्यांना सावधतेचे निर्देश दिले आहेत. औषधांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आरोग्य मंत्रालय आणि औषध नियंत्रक महासंचालनालय (DCGI) यांनी सर्व राज्यांतील FDA अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आहे.

### महाराष्ट्र सरकारचे तात्काळ पाऊल

या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने कोणताही धोका पत्करू नये, असा निर्णय घेतला आहे. अन्न आणि औषध प्रशासनाने कोल्ड्रिफ सिरप (PHENYLEPHRINE HYDROCHLORIDE & CHLORPHENIRAMINE MALEATE SYRUP) – बॅच क्रमांक SR-13 च्या विक्री आणि वितरणावर तात्काळ बंदी घातली आहे. या सिरपचे उत्पादन “स्रेसन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड, सुंगुवरचाथिरम, कांचीपुरम जिल्हा, तामिळनाडू” यांनी केले असल्याचे FDA च्या पत्रकात नमूद केले आहे. संबंधित बॅच मे 2025 मध्ये तयार करण्यात आली असून एप्रिल 2027 पर्यंत वापरण्यायोग्य असल्याचे पॅकेजिंगवर दर्शविण्यात आले आहे. तथापि, या बॅचमध्ये DEG विषारी पदार्थाचे अंश आढळल्याचा प्राथमिक अहवाल मिळाल्यानंतर राज्य सरकारने कोणतीही जोखीम न घेता हे उत्पादन बाजारातून तातडीने हटविण्याचे आदेश दिले आहेत.

### FDA चा परिपत्रक आणि सूचना

महाराष्ट्र FDA ने औषध विक्रेते, घाऊक व्यापारी, हॉस्पिटल फार्मसी तसेच डॉक्टरांना “सदर सिरपची विक्री, वितरण किंवा वापर तातडीने थांबवावा” अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत. तसेच, संबंधित बॅचचे साठे गोठवून ठेवण्याचे (freeze stock) आदेश देण्यात आले आहेत.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जर कोणाकडेही ‘कोल्ड्रिफ सिरप बॅच क्रमांक SR-13’ चा साठा असेल, तर त्यांनी तो तातडीने जवळच्या औषध निरीक्षक किंवा जिल्हा FDA कार्यालयाला कळवावा. या संदर्भात राज्य सरकारने हेल्पलाईन क्रमांक आणि ईमेल आयडी उपलब्ध करून दिले आहेत.

### तक्रार नोंदवण्यासाठी हेल्पलाईन आणि ईमेल

जनतेने खालील माध्यमांतून तक्रार नोंदवावी किंवा माहिती द्यावी:
टोल फ्री क्रमांक: 1800 222 365
ईमेल: jchq.fda-mah@nic.in
मोबाईल: 9892832289

या क्रमांकावर नागरिक, विक्रेते किंवा आरोग्य कर्मचारी कोणत्याही वेळी माहिती देऊ शकतात. प्रशासनाने खात्री दिली आहे की प्रत्येक तक्रारीवर त्वरित तपास करण्यात येईल आणि दोषी ठरल्यास कठोर कारवाई केली जाईल.

### राज्यस्तरावर समन्वय मोहीम सुरू

महाराष्ट्र FDA ने तामिळनाडू राज्यातील औषध नियंत्रण अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यास सुरुवात केली आहे. संबंधित बॅच महाराष्ट्रात वितरित झाली आहे का, याचा मागोवा घेण्यासाठी राज्यांतर तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. FDA निरीक्षकांना औषधांच्या घाऊक वितरण केंद्रे, मेडिकल स्टोअर्स आणि रुग्णालयांमध्ये तातडीने तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या सहाय्यक आयुक्तांना आणि औषध निरीक्षकांना बाजारात उपलब्ध असल्यास संबंधित उत्पादनाचा साठा जप्त करून सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### जनतेला सावधगिरीचे आवाहन

अन्न आणि औषध प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही प्रकारचा कफ सिरप वापरण्यापूर्वी त्याचे बॅच क्रमांक आणि उत्पादकाचे नाव तपासा. शंका असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. तसेच, संशयास्पद औषधाचा वापर टाळावा.

अनेकदा स्वस्त किंवा अवैध मार्गाने मिळणारी औषधे आरोग्यासाठी घातक ठरू शकतात. त्यामुळे जनतेने फक्त अधिकृत आणि नोंदणीकृत वैद्यकीय दुकानातूनच औषधे खरेदी करावीत, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## सरकारने मदत करणे आवश्यक

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून पैसे घेण्याचा निर्णय

# शेतकऱ्यांकडून पैसे घेण्याचा निर्णय

## राज्य शासनाचा निर्णय आश्यर्चकारक

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**'अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना सरकारने मदत करणे आवश्यक असताना त्याऐवजी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून पैसे घेण्याचा राज्य शासनाचा निर्णय आश्यर्चकारक आहे. मदतीऐवजी त्यांच्याकडून सक्तीची वसुली करणे चुकीचे आहे,' अशा शब्दांत माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी राज्य सरकारच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली. 'या निर्णयाचा फेरविचार करावा,' अशी मागणीही त्यांनी केली.**



राज्यातील पूरबाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून प्रतिटन पाच रुपये, तर मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रतिटन १० रुपये कपात याप्रमाणे प्रतिटन १५ रुपये कपात करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ऊस गाळपसंदर्भातील मंत्री समितीच्या बैठकीत काही दिवसांपूर्वी घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय) येथे पवार यांनी बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना पवार यांनी राज्य शासनाच्या निर्णयावर टीका केली.आज शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांच्याकडूनच पैसे घेणे अयोग्य आहे. शेतकऱ्यांकडून सक्तीची वसुली चुकीची असून, ही बाब मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालणार आहे. त्यांनी या निर्णयाचा फेरविचार करावा,' असे पवार म्हणाले.ते म्हणाले, 'राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीबाबत अंतिम प्रस्ताव दिला नाही, असे केंद्र सरकार म्हणते. राज्य आणि केंद्र सरकारमध्ये सुसंवाद असणे आवश्यक आहे. राज्य सरकारने दोन दिवसांत केंद्र सरकारकडे तसा प्रस्ताव द्यावा. केंद्र सरकारकडून निधी घेऊन वाटप सुरू करावे. अतिवृष्टी किंवा पूरपरिस्थिती ठरावीक जिल्ह्यात होती. त्यामुळे तेथे लक्ष केंद्रित करणे राज्य सरकारला सहज शक्य आहे. इतर ठिकाणचे अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करून तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.'

'नांदेड, परभणी, धाराशिव, जालना, बीड, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये शेतीचे आणि शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. माती वाहून गेली आहे. ऊसाचे किती नुकसान झाले, याचा आढावा वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या १२ ऑक्टोबर रोजी

### शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

केंद्र सरकारकडून निधी घेऊन वाटप सुरू करावे. अतिवृष्टी किंवा पूरपरिस्थिती ठरावीक जिल्ह्यात होती. त्यामुळे तेथे लक्ष केंद्रित करणे राज्य सरकारला सहज शक्य आहे. इतर ठिकाणचे अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करून तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.' 'नांदेड, परभणी, धाराशिव, जालना, बीड, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये शेतीचे आणि शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. माती वाहून गेली आहे.

होणाऱ्या नियामक मंडळाच्या बैठकीत घेतला जाईल. या बैठकीत सर्व साखर कारखान्यांचे अध्यक्ष नुकसानाची माहिती देतील. त्यानंतर राज्य आणि केंद्र सरकारशी याबाबत बोलणी करू,' असे शरद पवार यांनी स्पष्ट केले.राज्यातील पूरबाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून प्रतिटन पाच रुपये, तर मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रतिटन १० रुपये कपात याप्रमाणे प्रतिटन १५ रुपये कपात करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ऊस गाळपसंदर्भातील मंत्री समितीच्या बैठकीत काही दिवसांपूर्वी घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय) येथे पवार यांनी बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना पवार यांनी राज्य शासनाच्या निर्णयावर टीका केली.आज शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांच्याकडूनच पैसे घेणे अयोग्य आहे. शेतकऱ्यांकडून सक्तीची वसुली चुकीची असून, ही बाब मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालणार आहे. त्यांनी या निर्णयाचा फेरविचार करावा,' असे पवार म्हणाले.ते म्हणाले, 'राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीबाबत अंतिम प्रस्ताव दिला नाही, असे केंद्र सरकार म्हणते. राज्य आणि केंद्र सरकारमध्ये सुसंवाद असणे आवश्यक आहे. राज्य सरकारने दोन दिवसांत केंद्र सरकारकडे तसा प्रस्ताव द्यावा.


## 'सुश्री फाउंडेशन'तर्फे २७ शिक्षकांचा सन्मान'

# पालकांबरोबरच शिक्षकांनीही जागरूक राहण्याची गरज

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**शालेय विद्यार्थ्यांमधील व्यसनाधीनता रोखण्यासाठी पालकांबरोबरच शिक्षकांनीही जागरूक राहण्याची गरज असल्याची भावना 'पेस ग्रुप, पुणे' या सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. वंदना जोशी यांनी व्यक्त केली. जागतिक शिक्षक दिनानिमित्त 'सुश्री फाउंडेशन'तर्फे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कान, नाक, घसा तज्ज्ञ म्हणून वैद्यकीय व्यवसाय करीत असताना मुखाच्या कर्करोगाने त्रस्त रुग्णांवर आम्ही उपचार करतोच.**



पण अधिक कर्करुग्ण निर्माण होऊ नयेत यासाठी आम्ही उभारलेल्या लढ्यात जागरूक पालक तसेच शिक्षकांची मिळणारी साथ आमच्यासाठी महत्त्वाची असल्याचे डॉ. जोशी म्हणाल्या. या वेळी व्यसनांचे दुष्परिणाम सांगणारी लघुचित्रफीतही दाखविण्यात आली. सदाशिव मालशे तथा हरिओमकाका यांनी सुरू केलेल्या 'शिक्षकांची आनंदी दिवाळी' या उपक्रमांतर्गत राज्यातील विनाअनुदानित शाळांमधील २७ शिक्षकांचा सन्मान या वेळी करण्यात आला.

### शाळांमधील २७ शिक्षकांचा सन्मान

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देवेंद्र आवटे, विद्याधर पटवर्धन, विक्रम शिंदे यांच्यासह 'पुरुष मैत्र गटा'च्या सदस्यांनी परिश्रम घेतले. सदाशिव मालशे तथा हरिओमकाका यांनी सुरू केलेल्या 'शिक्षकांची आनंदी दिवाळी' या उपक्रमांतर्गत राज्यातील विनाअनुदानित शाळांमधील २७ शिक्षकांचा सन्मान या वेळी करण्यात आला. या उपक्रमाचे यंदा दुसरे वर्ष होते.

या उपक्रमाचे यंदा दुसरे वर्ष होते. व्यसनांपासून जर स्वत:ला रोखायचे असेल आणि चांगल्या सवयींचा अंगीकार करायचा असेल तर सवयींचा त्यात मोठा वाटा असतो. हे विचारात घेऊन या शिक्षकांना 'सवय तक्ता' देण्यात आला आणि या सवय तक्त्याच्या माध्यमातून मुलांनी चांगल्या सवयींचा अंगीकार करावा यासाठी एक उपक्रमदेखील शिक्षकांना समजावून सांगण्यात आला.या वेळी सुश्री फाउंडेशनचे सचिव वैभव रांजणगावकर, खजिनदार जान्हवी ओक तसेच श्रीराम सबनीस, शुभांगी कोपरकर, विजय जोशी, मधुमिलिंद मेहेंदळे, प्रमोद लिमये आदी उपस्थित होते.

वाहतूक कोंडीचा प्रश्न | चाकण मधील वाहतूक कोंडी विरोधात

# नागरिकांसोबत कंपन्यांचा एल्गार!

## स्थानिक नागरिकांसहित 200 कंपन्याचा सहभाग

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रातील महत्त्वाचे उद्योगधंदे असलेल्या चाकण परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गुंतागुंतीचा होत आहे. वेळ पैसा आणि आरोग्य या वाहतूक कोंडीमुळे ऐरणीवर आले आहेत. संताप आणि गैरसोय होत असल्यामुळे नागरिकांनी हा प्रश्न हाती घेतला आहे.**




प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे नागरिकांनी चाकणच्या वाहतूक कोंडी विरोधात येत्या गुरुवारी (दि .९) स्थानिक नागरिक, कामगार व उद्योजकांचा 'पायी मोर्चा' आकुर्डी येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कार्यालयावर धडकणार आहे. चाकण परिसरातील 200 हून अधिक कंपनी व्यवस्थापन यामध्ये सहभागी होणार आहे.

ट्रॅफिकमुक्त चाकण कृती समिती आणि एमआयडीसीतील २०० कंपन्यांच्या उद्योजकांच्या सहभागाने हा मोर्चा चाकण-मोशी मार्गे भक्ती-शक्ती निगडी ते पीएमआरडीए कार्यालयापर्यंत काढला जाणार आहे. चाकण येथील संग्रामदुर्ग किल्ल्यापासून सकाळी ९ वाजता मोर्चास सुरवात होईल. स्थानिक नागरिक व चाकण परिसरातील कामागार या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

चाकण परिसरात दररोज येणारे ट्रक, कंटेनर आणि अवजड वाहने यांच्यामुळे मोठी वाहतूक कोंडी आता नित्याचीच झाली आहे. स्थानिक नागरिकांना आणि व्यावसायिकांना दैनंदिन कामांमध्ये या वाहतूक कोंडीचा त्रास भोगावा लागत आहे. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणे अवघड झाले आहे, विद्यार्थ्यांना शाळेत पोचायला उशीर होत आहे, कारखान्यांमध्ये वेळेवर माल पोचवणे अवघड झाले आहे आणि रुग्णवाहिकाही या कोंडीमध्ये अडकल्या जात आहेत, यामुळे नागरिक पुरते वैतागले आहेत. चाकण परिसरातील प्रत्येक नागरिकांनी या मोर्चामध्ये

### नागरिकांसोबत रस्त्यावर उतरावे

याबाबत ट्रॅफिकमुक्त चाकण कृती समितीचे सदस्य कुणाल जाधव म्हणाले, "वाहतूक कोंडीच्या प्रश्नाबाबत पंचक्रोशीतील आमदार खासदारांना सहभागी होण्याची विनंती करण्यात आली आहे. यांनीही स्थानिक नागरिकांसोबत रस्त्यावर उतरावे."

# पिंपरी चिंचवडची प्रभाग रचना आज मंजूर होणार?

## पिंपरीची प्रभाग रचना "वेटिंगवर"; इच्छुकांचे प्रभाग रचनेकडे लक्ष

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महापालिकेच्या प्रभागरचनेला राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिली असतानाच, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभागरचनेला अद्याप मान्यता मिळालेली नाही. सोमवारी (दि.६) प्रभागरचनेला मान्यता मिळण्याची शक्यता आहे. त्यानंतरच प्रभागरचनेमध्ये बदल केला आहे की नाही, हे स्पष्ट होणार आहे. त्यामुळे इच्छुकांचे अंतिम प्रभागरचनेकडे लक्ष लागले आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूक ही २०१७ च्या प्रभागरचनेप्रमाणेच होणार असून, १२८ नगरसेवक संख्या कायम आहे. त्यानुसार महापालिकेने २२ ऑगस्टला चार सदस्यीय पद्धतीने ३२ प्रभागांची प्रारूप रचना जाहीर केली.

महापालिका निवडणूक विभागाने जाहीर केलेल्या प्रभागरचनेवर ३१८ हरकती, सूचना आल्या होत्या. या हरकतींवर राज्याचे सहकार आणि विपणन विभागाचे प्रधान प्रवीण दराडे यांनी १० सप्टेंबर रोजी एकाच दिवशी सुनावणी घेतली. हरकती व सूचनांवरील शिफारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रभागरचना अंतिम केली. १५ सप्टेंबरला महापालिका आयुक्त सिंह यांनी नगरविकास विभागाला प्रभागरचना सादर केली.

महापालिकेने सादर केलेली अंतिम प्रभागरचना राज्य शासन राज्य निवडणूक आयोगाला सादर करणार होते. त्यानंतर आयोगाच्या मान्यतेनंतर तीन ते सहा ऑक्टोबरदरम्यान अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध केली जाणार आहे. मात्र, पुणे महापालिकेच्या प्रभागरचनेला निवडणूक आयोगाने मंजुरी दिली आहे. असे असताना पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभागरचनेला अद्यापि मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे प्रभागरचनेमध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल होतात की काय, अशी शंका महाविकास आघाडीसह सर्वच राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना येऊ लागली आहे.

### इच्छुकांची मतदारांपर्यंत पोहोचण्याची धडपड

महापालिका निवडणूक दिवाळीनंतर होणार आहे. त्यासाठी इच्छुकांसह माजी नगरसेवकांनी प्रभागात प्रसिद्धीचे विविध फंडे सुरू केले आहेत. गणेशोत्सव, नवरात्र उत्सवात इच्छुकांनी जोरदार जाहिरातबाजी केली. दांडिया व गरबा कार्यक्रमांसह महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, तीर्थक्षेत्र सहलीचे आयोजन केले जात आहे. सांस्कृतिक कार्यक्रमातील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमस्थळी तसेच देवीच्या मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात फ्लेक्सबाजी करीत प्रसिद्धीची हौस भागवून घेण्यात आली. प्रभागांतील नागरिकांना सण व उत्सवाच्या शुभेच्छा देणाऱ्या एसएमएसचा मारा केला जात आहे.

" महापालिकेच्या प्रभागरचनेला अद्यापि निवडणूक आयोगाची मान्यता मिळाली नाही. सोमवारी मान्यता मिळण्याची शक्यता आहे. आयोगाची मान्यता मिळताच, प्रभागरचनेचे गॅझेट प्रसिद्ध केले जाईल.

**-अविनाश शिंदे,** सहायक आयुक्त, निवडणूक विभाग पिंपरी चिंचवड



## भूमिका

**पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भाषणांमधून अलीकडच्या काळात, प्रामुख्याने लालकिल्ल्यावरील स्वातंत्र्य दिनाच्या भाषणापासून दोन शब्दप्रयोग सातत्याने ऐकायला मिळतात. दिल्लीत चार दिवसांपूर्वी संघाच्या शताब्दीच्या कार्यक्रमातही ते मोदींनी उच्चारले. लोकसंख्येच्या रचनेतील बदल (डेमोग्राफिक चेंज) आणि घुसखोरी. हेच शब्द सरसंघचालक मोहन भागवत यांच्याही भाषणांमधून उच्चारले गेले आहेत.**

# मोदी-भागवतांचे ते दोन शब्द!



गेल्या महिन्यात दिल्लीमध्ये भागवत यांची तीन दिवसांची व्याख्यानमाला झाली, नागपूरमध्ये विजयादशमीच्या संघाच्या कार्यक्रमातही भागवत यांनी या शब्दांचा ऊहापोह केला. संघात किंवा भाजपमध्ये वरिष्ठ नेते कुठल्याही शब्दांचा वा विचारांचा जाहीरपणे उल्लेख करतात तेव्हा तो अचानक नसतो. त्यामागे नीट विचार केलेला असतो. कधी कोणता मुद्दा उपस्थित करायचा, त्याचा राजकीय लाभ कसा मिळू शकतो, किती मिळू शकतो याचे आडाखे संघ व भाजपमध्ये मांडलेले असतात. उदाहरणार्थ, २०१८ मध्ये दिल्लीत आयोजित केलेल्या तीन दिवसांच्या व्याख्यानमालेत भागवत यांनी पहिल्यांदाच, भारतातील सगळ्यांचा 'डीएनए' एकच आहे, असे विधान केले होते; त्याविषयी २०१३-१४ पासून संघामध्ये विचारमंथन केले जात होते असे सांगितले जाते. संघ वा भाजप अचानक मनात आले म्हणून कुठलीही गोष्ट करत नाही. विशिष्ट लक्ष्य गाठण्यासाठी ते हळूहळू पावले टाकतात. म्हणूनच मोदी आणि भागवत सध्या आपल्या भाषणांमध्ये लोकसंख्येच्या रचनेतील बदल आणि घुसखोरीच्या धोक्याबद्दल वारंवार बोलत असतील तर त्यामागील मुख्य कारण काय असेल, याकडे आता गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.सरसंघचालक मोहन भागवत यांनी गेल्या महिन्यात दिल्लीतल्या व्याख्यानमालेत, हिंदू कुटुंबांनी किमान तीन मुलांना जन्माला घातले पाहिजे, असे आवाहन केले. लोकसंख्यावाढीचा दर दोन टक्क्यांपेक्षा कमी होऊ नये असेही ते म्हणाले. यातून मुस्लिमांच्या लोकसंख्येच्या वाढीच्या दरापेक्षा हिंदूंच्या वाढीचा दर जास्त असला पाहिजे, असे ते सुचवत होते. दुसरा मुद्दा घुसखोरीचा. भारताच्या सीमाभागातून-विशेषत: पश्चिम बंगाल, आसाम, जम्मू-काश्मीर या राज्यांतून होणारी घुसखोरी थांबवली पाहिजे. ती अशीच सुरू राहिली तर त्या परिसरातील लोकसंख्येच्या रचनेत बदल होऊ शकतो. म्हणजेच हिंदुबहुल भाग मुस्लिमांचे होतील, असा दावा भागवत यांनी केला. लालकिल्ल्यावरून मोदींनी नेमके हेच सांगितले होते. लोकसंख्येच्या रचनेत बदल झाला तर राजकीयदृष्ट्या धोका निर्माण होईल. हिंदू नागरिकांना दिले जाणारे सरकारी लाभ इतर धर्माचे लोक घेतील. हिंदू नागरिकांच्या रोजगारापासून ते जगण्याच्या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांची घुसखोरी होईल. शिवाय, प्रत्यक्ष घुसखोर देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण करतील, असे मोदी यांना म्हणायचे असावे. सरसंघचालक जे काही बोलतात त्यातून संघाची दीर्घकालीन रणनीती स्पष्ट होते. कथितरीत्या वादग्रस्त ठरू लागलेल्या या दोन्ही मुद्द्यांवर संघाच्या कार्यकर्त्यांनी काय करायचे याचा संदेश भागवतांनी दिला. मोदींच्या भाषणांतून या दोन मुद्द्यांच्या भोवती नजीकच्या भविष्यात फिरणारी भाजपची निवडणुकीची रणनीती स्पष्ट होते. मोदी-भागवतांनी उपस्थित केलेल्या दोन्ही धोक्यांचा बिहारमध्ये तसेच पुढील काही महिन्यांमध्ये देशभर होऊ घातलेल्या मतदार फेरआढावा मोहिमेशी (एसआयआर) थेट संबंधही जोडता येऊ शकतो!बिहारमधील विधानसभा निवडणुकीची एखाद-दोन दिवसांमध्ये घोषणा होण्याची शक्यता आहे. इथे 'एसआयआर' करून झालेले आहे. त्यामागील प्रमुख उद्देश मोदी-भागवतांनी मांडलेल्या दोन मुद्द्यांशी निगडित होता असे मानता येते. कारण बिहारमध्ये बांगलादेश वा अन्य शेजारील देशांतून घुसखोरी झाली की नाही हे स्पष्ट होणार होते. बिहारच्या निवडणुकीचे वारे वाहू लागल्यापासून लोकसंख्येच्या रचनेतील बदल आणि घुसखोरी हे दोन्ही शब्द वेगाने भाजपच्या प्रचारात आले. मोदी बिहारमध्ये जाऊन याच दोन मुद्द्यांवर बोलले. मोदी वा भाजपच्या इतर नेत्यांना बिहारमध्ये घुसखोरी झाली असे वाटते. हे घुसखोर कालांतराने लोकसंख्येच्या रचनेमध्ये बदल करतील अशीही भीती त्यांना वाटते. मात्र, या दाव्यांवर केंद्रीय निवडणूक आयोग गप्प आहे.

## प्रासंगिक »

# उपायाचा अपाय

***गव्हाच्या आधारभूत किमतीत १०९ टक्क्यांची वाढ करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय राजकीय असेल, पण त्यामुळे देशाच्या कृषी प्रारूपाविषयी प्रश्न निर्माण होतात...***

आगामी दोन दशकांत विकसित भारत करण्यासाठी आर्थिक वाढीचा दर किमान आठ टक्के असायला हवा' अशा अर्थाचे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे विधान वास्तवतेची जाणीव दर्शवते. म्हणून ते स्वागतार्ह. स्वागत अशासाठी की सध्याच्या सहा टक्क्यांच्या गर्तेत अडकलेली आपली अर्थव्यवस्था आपणास अपेक्षित प्रगतीसाठी पुरेशी नाही, याची जाणीव अर्थमंत्र्यांच्या विधानात दिसते. एरवी जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून सहा टक्क्यांवर आनंदोत्सव करणाऱ्यांची आपल्याकडे कमतरता नाही. शारीरिक सुदृढतेसाठी ज्याप्रमाणे नुसत्या दंडातील बेटकुळ्या पुरेशा नसतात आपल्यासारख्या देशात उद्योग,आपली ओळख ऐतिहासिकदृष्ट्या कृषीप्रधान अशी करून दिली जात असली तरी शेतीतील हे 'प्रधान'पण जपणे दिवसेंदिवस अवघड होत चालले.

**अफगाणिस्तानातील तालिबानच्या राजवटीला भारत सरकारने अद्याप मान्यता दिलेली नाही, जगातील सध्याचा राजनैतिक, सामरिक आणि व्यापारी पट दिवसागणिक झपाट्याने बदलत असल्यामुळे काल ज्यांना शत्रू मानले, त्यांच्याशी आज मित्रत्वाच्या भावनेतून बोलावे लागत आहे. वर्षानुवर्षे ज्यांच्याशी घनिष्ठ मैत्री होती.**

# भारतात (तूर्त तरी) तालिबानचे स्वागत!

मैत्रीबाबत फेरविचार करावा लागत आहे. तालिबानने दुसऱ्यांदा अफगाणिस्तानचा ताबा घेतला चार वर्षांपूर्वी ऑगस्ट २०२१मध्ये. तालिबानने पहिल्यांदा अफगाणिस्तानातील सरकार उलथून लावले, तेव्हा आणि दुसऱ्यांदाही पदच्युत सरकारशी भारताचे दृढ स्नेहबंध होते. तशात तालिबानची निर्मितीच पाकिस्तानच्या सक्रिय पाठबळावर झाली आणि या जिहादी संघटनेने काश्मीरमध्येही दहशतवाद्यांप्रति जाहीर बंधुभाव प्रकट केल्यामुळे या संघटनेशी, तिच्या राजवटीशी आपण सुरुवातीपासूनच फटकून वागत आलो आहोत. मात्र टोळ्यांच्या अराजकतेपेक्षा काबूलमध्ये स्थिर राजवट असण्याला अफगाण जनतेची वाढती पसंती मिळत आहे. तशात पाकिस्तानला अफगाणिस्तानमध्ये पखडून आणि इतर संस्कृती मिटवून स्वत:चे अनिर्बंध राज्य प्रस्थापित करायचे आहे हेही तालिबानला उमगले आहे.



त्यामुळे पहिल्या खेपेस होते तितके आणि तसे, दुसऱ्यांदा सत्ताधीश झालेले तालिबान राज्यकर्ते पाकिस्तानला अनुकूल अजिबात नाहीत. याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे, गेली अनेक वर्षे भारताची अफगाणिस्तानमध्ये पायाभूत सुविधा उभारणी, औषधपुरवठा, धान्यपुरवठा आदी अनेक क्षेत्रांत सहभाग व गुंतवणूक आहे. योग, बॉलीवूड, क्रिकेट अशा अनेकपरींनी आलेली मोलाची अशी ही सुप्तशक्ती किंवा सॉफ्ट पॉवर. तिचे कालातीत महत्त्व जितके कोविडकाळात दिसून आले, तितकेच ते गेल्या सप्टेंबरमध्ये अफगाणिस्तानात झालेल्या विध्वंसक भूकंपापश्चातही अधोरेखित झाले. अशा अडचणीच्या क्षणी सर्वांत जवळचा आणि विश्वासू पुरवठादार देश भारतच आहे हे उमगायला तालिबान्यांना वेळ मात्र लागला. तरीदेखील या वर्षी दोन्ही देशांमध्ये औपचारिक आणि अनौपचारिक चर्चेच्या फेऱ्या वरचेवर होत होत्या. याच चर्चेची परिणती म्हणजे येत्या काही दिवसांमध्ये होऊ घातलेली तालिबान परराष्ट्रमंत्र्यांची भेट. पाकिस्तान-अफगाणिस्तान संबंधांमध्ये मिठाचा खडा पडण्याचे तात्कालिक कारण या वर्षाच्या सुरुवातीस घडले. पाकिस्तानातील ८० हजार अफगाण निर्वासितांना देश सोडून अफगाणिस्तानमध्ये जाण्यास सांगण्यात आले. तेव्हापासून दोन्ही देशांतील संबंध ताणलेले आहेत. भारत आणि अफगाणिस्तान जवळ आले, ते यानंतर. जानेवारी महिन्यातच भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री आणि अफगाण परराष्ट्रमंत्री मुत्ताकी यांच्या भेटीगाठी सुरू झाल्या. हे दोघेही दुबईत भेटत होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

स्वच्छतेची मोहीम

## स्वच्छतेसाठी जिल्हा परिषद यंत्रणा तत्पर

# 82 गावांत आरोग्य-स्वच्छतेची मोहीम!

## अनेक गावांमधून पाणी ओसरले

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे जवळपास सहा तालुक्यांतील ८२ गावांमध्ये पाणी शिरले. सद्यस्थितीत या गावांमधून पाणी कमी होत आहे किंवा अनेक गावांमधून पाणी पूर्णपणे ओसरले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या यंत्रणाकडून या सर्व गावांमध्ये स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.**



सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने नदी, ओढे, नाले भरून वाहत आहेत. पूरग्रस्त भागात स्वच्छतेची कामे व उपाययोजना करण्यासाठी व्यापक स्वरूपात मोहीम हाती घेण्यात आलेल्या असून, या सर्व गावांमध्ये आरोग्य शिबिरे घेऊन नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आल्याची माहिती जंगम यांनी दिली. पूर नंतर आजारांची लागण, दूषित पाणी व घाण साचून राहणे यातून गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने आरोग्य व स्वच्छता मोहीम घेण्यात आली आहे. सर्व ८२ गावांतील सार्वजनिक ठिकाणी मोहीम सुरू राहणार आहे.शाळा व अंगणवाडीत निर्जंतुकीकरण करण्यात येत आहे. ब्लीचिंग पावडर, फिनाईल, क्लोरीन इ. द्वारे रस्ते, पाणी व सार्वजनिक जागा निर्जंतुक करण्यात येत आहे. पाण्याच्या टाक्या व विहिरी स्वच्छ करणे. क्लोरीन टॅब्लेट/उकळलेले पाणी वापरण्याची सूचना देण्यात आलेल्या आहेत. पिण्याच्या पाण्याचा बाधित स्त्रोत तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आले आहेत. पिण्याच्या पाण्याचा पर्यायी स्त्रोत उपलब्ध करून देण्यात आला आहे. डासमुक्ती मोहीम हाती घेण्यात आली आहे. ग्रामपंचायतीकडे फॉगिंग मशीन उपलब्ध आहेत, त्या ठिकाणी ते करण्यात येत आहे.

साचलेले घाण पाण्यात डासांची निर्मिती होऊ नये म्हणून ऑईल फवारणी करण्यात येत आहे. तात्पुरते निवारा केंद्राच्या ठिकाणी स्वच्छता व्यवस्थापन करण्यात आले आहे. ग्रामस्थ या केंद्रातून घराकडे स्थलांतरीत होत आहेत. पुरानंतर लगेच स्वच्छतेची योग्य उपाययोजना हाती घेतल्यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकली नाही. त्यामुळे स्थानिक प्रशासन, नागरिक, स्वयंसेवी संस्था यांच्यात समन्वय साधून कार्यक्षमतेने काम करण्यात येत आहे, असे जंगम यांनी यावेळी सांगितले.'जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे जवळपास सहा तालुक्यांतील ८२ गावांमध्ये पाणी शिरले. सद्यस्थितीत या गावांमधून पाणी कमी होत आहे किंवा अनेक गावांमधून पाणी पूर्णपणे ओसरले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या यंत्रणाकडून या सर्व गावांमध्ये स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली. सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने नदी, ओढे, नाले भरून वाहत आहेत. पूरग्रस्त भागात स्वच्छतेची कामे व उपाययोजना करण्यासाठी व्यापक स्वरूपात मोहीम हाती घेण्यात आलेल्या असून, या सर्व गावांमध्ये आरोग्य शिबिरे घेऊन नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आल्याची माहिती जंगम यांनी दिली.

पूर नंतर आजारांची लागण, दूषित पाणी व घाण साचून राहणे यातून गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने आरोग्य व स्वच्छता मोहीम घेण्यात आली आहे. सर्व ८२ गावांतील सार्वजनिक ठिकाणी मोहीम सुरू राहणार आहे.शाळा व अंगणवाडीत निर्जंतुकीकरण करण्यात येत आहे. ब्लीचिंग पावडर, फिनाईल, क्लोरीन इ. द्वारे रस्ते, पाणी व सार्वजनिक जागा निर्जंतुक करण्यात येत आहे. पाण्याच्या टाक्या व विहिरी स्वच्छ करणे. क्लोरीन टॅब्लेट/उकळलेले पाणी वापरण्याची सूचना देण्यात आलेल्या आहेत. पिण्याच्या पाण्याचा बाधित स्त्रोत तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आले आहेत. पिण्याच्या पाण्याचा पर्यायी स्त्रोत उपलब्ध करून देण्यात आला आहे. डासमुक्ती मोहीम हाती घेण्यात आली आहे. ग्रामपंचायतीकडे फॉगिंग मशीन साचलेले घाण पाण्यात डासांची निर्मिती होऊ नये म्हणून ऑईल फवारणी करण्यात येत आहे.

### आरोग्य समस्या उद्भवली नाही

तात्पुरते निवारा केंद्राच्या ठिकाणी स्वच्छता व्यवस्थापन करण्यात आले आहे. ग्रामस्थ या केंद्रातून घराकडे स्थलांतरीत होत आहेत. पुरानंतर लगेच स्वच्छतेची योग्य उपाययोजना हाती घेतल्यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकली नाही. त्यामुळे स्थानिक प्रशासन, नागरिक, स्वयंसेवी संस्था यांच्यात समन्वय साधून कार्यक्षमतेने काम करण्यात येत आहे.

# समुद्रात अडकल्याने प्रवासी झाले होते भयभीत

## किनाऱ्यावर येताच जीव पडला भांड्यात, नितेश राणेंची पोस्ट काय?

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विरार येथील समुद्रात फेरीबोटीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा जीव टांगणीला लागला होता. कारण सफाळ्याच्या जालसार येथून निघालेल्या रो रो सेवेची बोट विरारच्या नारींगी येथील जेट्टीजवळ समुद्रात अडकून पडली होती. जेट्टीच्या रॅम्पचा हायड्रोलिक पंप तुटल्याने बोट जवळपास दीड तास अडकून पडली होती.**

विरारच्या समुद्र किनाऱ्यावर रविवारी संध्याकाळी साडेपाच वाजता सफाळ्याच्या जालसार येथून फेरीबोट निघाली होती.बोट प्रवाशांनी खच्चून भरली होती, विरारच्या नारिंगी जेट्टीजवळ ही बोट थांबणार होती. मात्र, येथे बोट अडकल्याने प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली, काही प्रवासी भयभीतही झाले होते.

या घटनेतून प्रवासी वाचले आहेत. त्यानंतर सगळ्यांनीच सुटकेचा निश्वास सोडला आहे. समुद्र आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी या घटनेबाबत पोस्ट केली आहे.सफाळे ते विरार दरम्यान सुरु असलेली रो-रो प्रवासी बोट सेवा आज तांत्रिक बिघाडामुळे काही काळासाठी विस्कळीत झाली. म्हारंबळपाडा जेट्टीजवळ बोटीचा रॅम्प उचलणाऱ्या हायड्रॉलिक यंत्रणेचा



पाईप तुटल्याने बोट बंद पडली. या प्रकारामुळे प्रवाशांची काहीशी गैरसोय झाली. सदर घटनेची तात्काळ दखल घेऊन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डच्या (MMB) अधिकाऱ्यांना बोटीची तांत्रिक दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर बोट जेट्टीवर सुरक्षितपणे पोहोचली. बोटीवरील सर्व प्रवासी आणि गाड्या सुखरूप पणे उतरले आहेत.

सदरील घटनेचा विस्तृत अहवाल देण्याचे आदेश महाराष्ट्र सागरी मंडळास दिले आहेत. अशी पोस्ट नितेश राणे यांनी केली आहे.रॅंप हा एक उतार असलेला धातूचा किंवा मिश्र संरचनेचा प्लेटफॉर्म असतो, जो घाट जेट्टी आणि फेरीबोटच्या डेक यांना जोडतो. त्यावरून वाहनं फेरीवर चढतात आणि उतरतात. फेरी बोट जेट्टीवर आली की रॅम्प उचलला जातो. मात्र, रॅम्पला असलेला हायड्रोलिक पाईप अचानक तुटला. त्यामुळे प्रवासी बोटीत खोळंबले. या बोटीत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. बोट जेट्टीवर आणण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, या रो रो बोटीवरील कर्मचारी यांना कोणतेही आपत्कालीन परिस्थितीत प्रशिक्षण दिलं नसल्यामुळे त्यांना काही करता आलं नाही.

### हायड्रोलिक पाईप अचानक तुटला

सायकलच्या टायर ट्यूबने फुटलेला पाईप बांधून त्यांचे केविलवाणे प्रयत्न सुरू होते, विरार येथील समुद्रात फेरीबोटीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा जीव टांगणीला लागला होता. कारण सफाळ्याच्या जालसार येथून निघालेल्या रो रो सेवेची बोट विरारच्या नारींगी येथील जेट्टीजवळ समुद्रात अडकून पडली होती.

## वांगचुक अटक बेकायदा


## तुरुंगात राहण्याची तयारी; वांगचुक यांचा संदेश

# हिंसेप्रकरणी चौकशीची मागणी!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली (रासुका) जोधपूर मध्यवर्ती कारागृहात कैदेत असलेले पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी लेहमधील हिंसाचार आणि त्यामध्ये चौघांच्या मृत्यूची न्यायालयीन चौकशीची मागणी केली आहे. न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले जात नाहीत, तोपर्यंत वांगचुक यांनी तुरुंगात राहण्याची तयारी केली आहे, अशी माहिती त्यांच्या वकिलांनी दिली..**

## गीतांजली अंगमो सर्वोच्च न्यायालयात



वांगचुक यांना झालेला अटक बेकायदा असून, त्यांची ताबडतोब सुटका करावी अशी मागणी करणारी हेबिअस कॉर्पस याचिका वांगचुक यांची पत्नी गीतांजली अंगमो यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. या याचिकेद्वारे त्यांनी वांगचुक यांना झालेल्या अटकेलाही आव्हान दिले आहे. या याचिकेवर सोमवारी न्या. अरविंद कुमार आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे. विवेक तनखा आणि सर्वम रितम खरे हे अंगमो यांची बाजू मांडणार आहेत.लडाखला राज्याचा दर्जा दिला जावा, तसेच या केंद्रशासित प्रदेशाचा राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टात समावेश करण्यात यावा या मागणीसाठी लेहमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागून चौघांचा मृत्यू झाला होता. आणि ९० जण जखमी झाले होते. या घटनेनंतर दोन दिवसांनी २६ सप्टेंबरला वांगचुक यांना कठोर 'रासुका'खाली ताब्यात घेण्यात आले.रासुका'खाली ताब्यात घेण्यात आलेल्या कैद्याला कोणत्याही खटल्याविना १२ महिने तुरुंगात ठेवण्याची तरतूद आहे. वांगचुक यांचे पाकिस्तानशी संबंध असल्याचा दावा लडाख पोलिसांनी केला आहे. तर गृह मंत्रालयाने त्यांच्या स्वयंसेवी संस्थेला परदेशी निधी मिळण्यासाठी आवश्यक परवाना रद्द केला आहे.'लेह शिखर संघटने'चे कायदा सल्लागार मुस्तफा हाजी आणि सोनम यांचे बंधू का त्सेतन डोर्जी ले यांनी शनिवारी जोधपूर तुरुंगात सोनम वांगचुक यांची भेट घेतली. त्यांनी सोनम यांना वाचण्यासाठी दोन पुस्तके दिली, तसेच त्यांनी काही कपडे आणि बूटही मागवले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ही भेट ४० मिनिटे चालली. यावेळी सोनम वांगचुक यांनी हाजी मुस्तफा यांच्याकडे संदेश दिला. मी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या बरा आहे. माझी चिंता करणाऱ्या आणि माझ्यासाठी प्रार्थना करणाऱ्या सर्वांचे आभार. हिंसाचारात मृत्यू झालेल्या कुटुंबांचे मी सांत्वन करतो. या चौघांच्या मृत्यूची स्वतंत्र न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे आणि तसे होत नाही, तोपर्यंत मी तुरुंगात राहायला तयार आहे. वांगचुक यांना झालेला अटक बेकायदा असून, त्यांची ताबडतोब सुटका करावी अशी मागणी करणारी हेबिअस कॉर्पस याचिका वांगचुक यांची पत्नी गीतांजली अंगमो यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. या याचिकेद्वारे त्यांनी वांगचुक यांना झालेल्या अटकेलाही आव्हान दिले आहे. या याचिकेवर सोमवारी न्या. अरविंद कुमार आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे. विवेक तनखा आणि सर्वम रितम खरे हे अंगमो यांची बाजू मांडणार आहेत.लडाखला राज्याचा दर्जा दिला जावा, तसेच या केंद्रशासित प्रदेशाचा राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टात समावेश करण्यात यावा या मागणीसाठी लेहमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागून चौघांचा मृत्यू झाला होता. आणि ९० जण जखमी झाले होते. या घटनेनंतर दोन दिवसांनी २६ सप्टेंबरला वांगचुक यांना कठोर 'रासुका'खाली ताब्यात घेण्यात आले.रासुका'खाली ताब्यात घेण्यात आलेल्या कैद्याला कोणत्याही खटल्याविना १२ महिने तुरुंगात ठेवण्याची तरतूद आहे. वांगचुक यांचे पाकिस्तानशी संबंध असल्याचा दावा लडाख पोलिसांनी केला आहे सल्लागार मुस्तफा हाजी आणि सोनम यांचे बंधू का त्सेतन डोर्जी ले यांनी शनिवारी जोधपूर तुरुंगात सोनम वांगचुक यांची भेट घेतली.

### ताबडतोब सुटका करावी

सोनम यांचे बंधू का त्सेतन डोर्जी ले यांनी त्यांनी काही कपडे आणि बूटही मागवले आहेत. वांगचुक यांची भेट घेतली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ही भेट ४० मिनिटे चालली. यावेळी सोनम वांगचुक यांनी हाजी मुस्तफा यांच्याकडे संदेश दिला. मी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या बरा आहे. माझी चिंता करणाऱ्या आणि माझ्यासाठी प्रार्थना करणाऱ्या सर्वांचे आभार. हिंसाचारात मृत्यू झालेल्या कुटुंबांचे मी सांत्वन करतो. या चौघांच्या मृत्यूची स्वतंत्र न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे आणि तसे होत नाही.

# अमेरिकेने भारताचा मान राखणे आवश्यक

## व्यापार कराराच्या मुद्द्यावर जयशंकर यांची स्पष्टोक्ती

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेबरोबर व्यापार करार करण्यास भारत उत्सुक आहे, मात्र भारत ज्या बाबींना नकार देत आहे त्याचा मान अमेरिकेने राखणे आवश्यक आहे, असे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी रविवारी स्पष्ट केले. त्याचवेळी या द्विपक्षीय व्यापार करारावर सहमती घडवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहितीही परराष्ट्रमंत्र्यांनी दिली.**




अमेरिकेने भारतावर ५० टक्के आयातशुल्क लादल्यानंतर व्यापार करारावरील चर्चेला काहीसा धक्का बसला होता. आता ती पुन्हा सुरू झाली असून, गेल्या महिन्यात दोन्ही बाजूंच्या शिष्टमंडळांनी एकमेकांच्या देशाचा दौरा कला. कृषी उत्पादन आणि दुग्धजन्य पदार्थांच्या क्षेत्रांबाबत अमेरिका काही अटी घालण्यासाठी आग्रही आहे. मात्र, त्याचे देशांतर्गत शेतीवर होणारा परिणाम विचारात घेऊन केंद्र सरकारतर्फे त्याला नकार दिला जात आहे.नवी दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात संवाद साधताना, जयशंकर यांनी दोन्ही देशांदरम्यान काही मतभेद असल्याचे मान्य केले. व्यापार करारावर दोन्ही देशांमध्ये संपूर्ण सहमती झाली नाही, त्याला आयातशुल्क कारणीभूत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, अमेरिका ही जगातील सर्वात मोठी बाजारपेठ असल्यामुळे त्या देशाबरोबर सहमती होणे गरजेचे असल्याचेही जयशंकर यांनी स्पष्ट केले.व्यापार कराराच्या वाटाघाटींमध्ये भारत आणि अमेरिकेदरम्यान काही मतभेद आहेत. काही मुद्द्यांवर वाटाघाटी करणे शक्य असते. काही मुद्द्यांवर वाटाघाटी करता येत नाहीत.

### सरकारतर्फे दिला जात आहे नकार


अमेरिकेने भारतावर ५० टक्के आयातशुल्क लादल्यानंतर व्यापार करारावरील चर्चेला काहीसा धक्का बसला होता. आता ती पुन्हा सुरू झाली असून, गेल्या महिन्यात दोन्ही बाजूंच्या शिष्टमंडळांनी एकमेकांच्या देशाचा दौरा कला. कृषी उत्पादन आणि दुग्धजन्य पदार्थांच्या क्षेत्रांबाबत अमेरिका काही अटी घालण्यासाठी आग्रही आहे. मात्र, त्याचे देशांतर्गत शेतीवर होणारा परिणाम विचारात घेऊन केंद्र सरकारतर्फे त्याला नकार दिला जात आहे.

## 'कॉफी विथ करण'च्या 'कॉफी हॅम्पर'मध्ये भन्नाट गोष्टी!



बॉलिवूड दिग्दर्शक करण जोहर हा वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत असतो. नुकताच करणचा लोकप्रिय कार्यक्रम कार्यक्रम 'कॉफी विथ करण'चा सीझन ८ पार पडला. वेगवेगळ्या बॉलिवूड कलाकारांनी या नव्या सीझनमध्ये हजेरी लावली आणि मनसोक्त गॉसिप करत गप्पा मारल्या. गॉसिपप्रमाणेच करण जोहरचा हा चॅट शो त्याच्या खास 'कॉफी हॅम्पर'मुळेही चर्चेत असतो. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या पाहुण्यांबरोबर 'रॅपिड फायर' राऊंड खेळत करण त्या पाहुण्यांपैकी एकाचं नाव विजेता म्हणून जाहीर करतो अन् त्या व्यक्तिला करण जोहरकडून हे खास 'कॉफी हॅम्पर' देण्यात येतं. दिसायला एकदम मोठं असलेल्या या हॅम्परमध्ये सेलिब्रिटीजना नेमक्या कोणत्या भेटवस्तू मिळतात याची प्रेक्षकांना उत्सुकता असते. या हॅम्परमध्ये अत्यंत महागड्या आणि ऊंची वस्तु असतात ही गोष्ट याआधीदेखील करण जोहरने स्पष्ट केली होती.आता नुकतंच एका व्हिडीओच्या माध्यमातून करणने प्रथमच या त्याच्या खास 'कॉफी हॅम्पर'मध्ये नेमकं काय काय असतं याबद्दल खुलासा केला आहे. या हॅम्परमधील सगळ्याच गोष्टींचा उलगडा करणने केला नसला तरी प्रामुख्याने या हॅम्परमध्ये सेलिब्रिटीजना कोणत्या गोष्टी दिल्या जातात ते करणने सांगितलं आहे. करणने या व्हिडीओच्या माध्यमातून ते हॅम्पर उघडून त्यातील काही खास गोष्टी दाखवल्या आहेत. करणच्या या झकास कॉफी हॅम्परमध्ये मोबाइल फोन्स आणि गो प्रो कॅमेरासारख्या इलेक्ट्रॉनिक गोष्टी असतात. याबरोबरच काही स्कीन केअर आणि ब्युटी प्रॉडक्टही आपल्याला पाहायला मिळतात. ऊंची ब्रँडचा चहा, याबरोबरच या आठव्या सीझनच्या निमित्ताने करणने या हॅम्परमध्ये एक सुंदरसा हाताने नवलेला कॉफी मगदेखील सामील केला आहे.

# मतभेद सर्वत्र होतात : राणी



काजोल व राणी या दोघीही बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील सुप्रसिद्ध अभिनेत्री आहेत. अजुनही सिनेसृष्टीत सक्रिय असलेल्या या दोघीही एकमेकींच्या नातवाईक आहेत. काजोलचे वडील शोमू मुखर्जी आणि राणीचे वडील राम मुखर्जी हे सख्खे चुलत भाऊ होते. त्या नात्याने काजोल व राणी या चुलत बहिणी आहेत. दोघींचं जवळचं नातं असलं तरी त्यांचं एकमेकींशी फार सख्य नाही. राणीने काजोलबद्दल एका मुलाखतीत प्रतिक्रिया दिली आहे. 'गॅलाटा प्लस' ला दिलेल्या मुलाखतीत राणीने काजोल व तिच्या नात्याबद्दल विधान केलं. ती म्हणाली, "मला वाटतं की कुटुंब एक अशी गोष्ट आहे जी तुमच्यासोबत कायम राहते. त्यामुळे जगाने तुमच्याकडे कुटुंबासारखं पाहणं गरजेचं असतं. मतभेद सर्वत्र होतात, पण मतभेदाचे कारणच नसेल तर मतभेद का व्हावेत? माझ्यात आणि काजोलमध्येही तेच झालं. जे झालं ते फक्त गैरसमज व एकमेकींशी नीट संवाद न साधल्याने झालं."राणीने काजोलशी असलेल्या मतभेदाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे, त्यामुळे त्यांच्यातील दुरावा मिटल्याची चर्चा होत आहे. राणीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ती शेवटची 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' या चित्रपटात झळकली होती. सध्या ती तिच्या आगामी चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. काजोलबद्दल बोलायचं झाल्यास ती 'लस्ट स्टोरीज २' या नेटफ्लिक्सवरील चित्रपटात दिसली होती. याशिवाय तिची द ट्रायल नावाची वेब सीरिज चांगलीच गाजली होती. या दोन्ही ओटीटीवरील कलाकृती होत्या.काजोल व राणी या दोघीही बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील सुप्रसिद्ध अभिनेत्री आहेत.

## प्रियांकाचा बहिणीसाठी खास मेसेज

'बिग बॉस १७' हा शो अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. शोच्या ग्रँड फिनालेला अवघे चार दिवस बाकी आहेत. अंकिता लोखंडेचा पती या शोच्या फिनालेमध्ये पोहोचू शकला नाही. मुनव्वर फारुकी, मनारा चोप्रा, अभिषेक कुमार, अरुण महाशेट्टी व अंकिता लोखंडे हे टॉप पाच स्पर्धक फिनालेमध्ये पोहोचले आहेत. मनारा फिनालेमध्ये पोहोचल्यानंतर तिची बहीण व बॉलीवूड अभिनेत्री प्रियांका चोप्राने तिच्यासाठी पोस्ट शेअर केली आहे. प्रियांका चोप्रा ही मनारा चोप्राची मामेबहीण आहे.

मनारा या शोमध्ये सहभागी झाल्यानंतरही प्रियांकाने इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करत मनाराला शुभेच्छा दिल्या होत्या. त्यानंतर आता मनारा फिनालेमध्ये पोहोचल्यानंतर प्रियांकाने तिचा एक फोटो पोस्ट करत तिचं अभिनंदन केलं आणि तिच्यासाठी मेसेज पाठवला आहे.प्रियांका चोप्राने मनाराचा बिग बॉसमधील एक फोटो स्टोरीला शेअर केला. "आपलं बेस्ट दे आणि बाकी सगळं विसरून जा," असं कॅप्शन दिलं आहे. तिने मनारा चोप्राला टॅग करत रेड हार्ट इमोजीही पोस्ट केला आहे. यासोबत प्रियांकाने मिताली आणि तिच्या आईलाही टॅग केलं आहे.काही दिवसांपूर्वी प्रियांका चोप्राची आई मधु चोप्रा यांनीही 'बिग बॉस १७' मधील स्पर्धक

## विजय देवरकोंडाबरोबर साखरपुडा, रश्मिका मंदाना म्हणाली...

रश्मिका मंदान्ना आणि विजय देवरकोंडा यांच्या साखरपुड्याच्या बातमीने सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे आणि त्यांच्या चाहत्यांना या बातमीने खूप आनंद झाला आहे. असे म्हटले जात आहे की, या जोडप्याने शुक्रवारी (३ ऑक्टोबर) हैदराबादमध्ये एका खासगी समारंभात साखरपुडा केला. दरम्यान, साखरपुड्याच्या या पसरलेल्या या वृत्तानंतर रश्मिकाने तिची पहिली इन्स्टाग्राम पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्री रश्मिकाने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. साखरपुड्याबद्दल काहीही उघड करण्याऐवजी, तिने तिच्या आगामी 'द गर्लफ्रेंड' चित्रपटाचा टीझर शेअर केला आणि चित्रपट प्रदर्शित होण्याची तारीखही जाहीर केली. "मला माहीत आहे की, तुम्ही सगळे याची वाट पाहत होता", असे तिने या पोस्टमध्ये लिहिले. हा चित्रपट ७ नोव्हेंबरला तेलुगू, तमीळ, हिंदी, कन्नड व मल्याळम भाषांमध्ये प्रदर्शित होणार असल्याचेही तिने जाहीर केले. रश्मिकाने तिच्या आगामी चित्रपटाचा टीझर शेअर करताच, चाहत्यांनी तिच्या इन्स्टाग्रामवर कमेंट्स केल्या आहेत. वापरकर्त्यांनी तिला तिच्या साखरपुड्याबद्दल विचारले; तर काहींनी तिच्या चित्रपटाच्या टीझरचे कौतुक केले आणि त्याबाबत उत्साह व्यक्त केला.

# अनन्या पांडे आदित्य रॉय कपूरला डेट करतेय



बॉलीवूड अभिनेता चंकी पांडेची लेक अनन्या पांडे ही अभिनेता आदित्य रॉय कपूरला डेट करत आहे. दोघेही अनेकदा एकत्र व्हेकेशनला जाताना व इव्हेंट्सला जाताना पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद होतात. अनन्या व आदित्यचं नातं बॉलीवूडमधील चर्चेचा विषय आहे. आता अनन्याच्या रिलेशनशिपबाबत चंकीने प्रतिक्रिया दिली आहे. आपण आपल्या २५ वर्षांच्या मुलीवर नियंत्रण ठेवू इच्छित नाही, असं त्याने म्हटलं आहे. 'लेहरेन'ला दिलेल्या मुलाखतीत चंकीला अनन्याच्या रिलेशनशिपबद्दल आणि तिच्या मुलाखतींमध्ये ती आदित्यचा उल्लेख करते याबाबत विचारण्यात आलं. त्यावर चंकी म्हणाला, "ठीक आहे. मला वाटतं की ती २५ वर्षांची आहे, ती माझ्यापेक्षा जास्त पैसे कमावत आहे. त्यामुळे तिला हवं ते करायला ती मोकळी आहे. माझ्या २५ वर्षांच्या मुलीला तिने काय करावं हे सांगण्याची माझी हिंमत कशी होईल." चंकीने चित्रपटांमध्ये अनन्याने केलेल्या इंटिमेट सीनबद्दलही प्रतिक्रिया दिली. "मला त्या सीनबद्दल काहीच अडचण नाही. मी हॉलीवूड चित्रपटांमध्ये इंटिमेट सीन पाहिले आहेत. ते सीन करण्यात काही गैर नाही, तुम्हालाही ते स्वीकारावं लागेल," असं चंकी म्हणाला.चंकीला अनन्या व रायसा या दोन मुली आहेत. या मुली त्याच्याकडे सल्ला घेण्यासाठी येतात का? असं विचारल्यावर तो म्हणाला, "माझ्या दोन्ही मुली खरोखरच भावनाच्या (चंकीची पत्नी) खूप जवळ आहेत. जेव्हा त्यांना काही हवं असतं तेव्हा त्या मला फोन करतात, नाहीतर त्या त्यांच्या आईच्या खूप जवळ आहेत. अर्थात भावना व त्यांच्या वयात माझ्याइतकं अंतर नाही. पण जेव्हा त्यांना कोणताही सल्ला हवा असतो तेव्हा मी त्यांच्यासाठी हजर असतो."चंकीने अनन्याचं कौतुक केलं .

## पाकिस्तानकडे दुर्लक्ष

## सामन्यानंतर थेट ड्रेसिंग रूममध्ये पोहोचली टीम इंडिया

# भारताचा पाकिस्तानवर विजय!

## २-० चा विक्रम कायम ठेवला

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय महिला संघाने पाकिस्तानला आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक सामन्यात दणदणीत विजय मिळवला आहे. टीम इंडियाने वर्ल्डकपमध्ये सलग दुसरा विजय नोंदवला. पाकिस्तान संघाला १५९ धावांवर सर्वबाद केलं आणि शानदार विजय मिळवला. श्रीलंकेला पराभूत केल्यानंतर, भारताने आता पाकिस्तानला पराभूत करून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.**



या विजयासह, भारताने सलग १२ व्यांदा पाकिस्तानला पराभूत करून आपला विक्रम कायम ठेवला आहे. यासह, विश्वचषकात पाकिस्तान महिला संघावर सलग पाचवा विजय मिळवला आहे. भारतीय संघाने पाकिस्तानवर विजय मिळवल्यानंतर हरमनसह संपूर्ण संघ थेट ड्रेसिंग रूमच्या दिशेने निघाला. यासह आशिया चषकातील सामन्यांप्रमाणे महिला विश्वचषकातही भारताच्या महिला संघाने पाकिस्तानी संघातील खेळाडूंशी हस्तांदोलन केलं नाही. तर नाणेफेकीदरम्यानही हरमनप्रीत कौरने फातिमा सनाशी हस्तांदोलन केलं नाही, ना नजरानजर झाली.नाणेफेक गमावल्यानंतर, टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि ५० षटकांत २४७ धावांवर गारद झाला. टीम इंडियाकडून हरलीन देओलने सर्वाधिक ४६ धावा केल्या. २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानी महिला संघ ४३ षटकांत १५९ धावांवर सर्वबाद झाला आणि टीम इंडियाने पाकिस्तानवर शानदार विजय मिळवला. टीम इंडियाकडून क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी तीन विकेट घेतल्या. सामन्यादरम्यान मैदानावर प्रचंड प्रमाणात कीटक आल्याने अक्षरश: सामना काही वेळ थांबवण्यात आला होता, जेणेकरून मैदानावर स्प्रे करता येईल.भारताने दिलेल्या २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात खूपच खराब झाली आणि २६ धावांत त्यांनी तीन विकेट गमावल्या. यानंतर, सिद्रा अमीनने एका टोकाला पाय घट्ट रोवून ठेवत संघाचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला पण दुसऱ्या टोकाकडून नियमित अंतराने विकेट पडत राहिल्या. या सामन्यात सिद्रा अमीनने १०६ चेंडूत ८१ धावा केल्या. दरम्यान, आठ पाकिस्तानी खेळाडूंना डावात दुहेरी आकडा गाठता आला नाही.टीम इंडियाकडून क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा या सर्वात यशस्वी फलंदाज ठरल्या. क्रांतीने तिच्या १० षटकांमध्ये फक्त २० धावा देत तीन विकेट घेतल्या. तर दीप्तीने ९ षटकांत ४५ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. तर स्नेह राणाने १ विकेट घेतली.नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीला उतरल्यानंतर, भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. स्मृती मानधना तिच्या चांगल्या सुरुवातीचा फायदा घेऊ शकली नाही आणि २३ धावांवर बाद झाली. स्मृती लवकर बाद झाल्याने भारताच्या धावांची गती कमी झाली. त्यानंतर प्रतिका रावल ३१ धावा करत बाद झाली. हरलीन देओलने काही शानदार फटके खेळले पण ती ४६ धावांवर बाद झाल्याने तिचं अर्धशतक हुकलं.दीप्ती शर्मानेही चांगली सुरुवात केली, पण ती २५ धावांवर बाद झाली. स्नेह राणाने देखील चांगले फटके खेळले. शेवटच्या षटकांमध्ये रिचा घोषने २० चेंडूत ३५ धावांची दमदार खेळी करत भारताला २४७ धावांपर्यंत पोहोचवलं. वूमन्स वर्ल्डकप स्पर्धेत भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर तब्बल ८८ धावांनी दणदणीत विजय मिळवला. श्रीलंकेपाठोपाठ भारतीय संघाने पाकिस्तानला नमवत वर्चस्व सिद्ध केलं. कीटकांच्या प्रादुर्भावामुळे खंडित झालेल्या सामन्यात भारताने २४७ धावांची मजल मारली. पाकिस्तानला हे लक्ष्य पेलवलं नाही आणि त्यांचा डाव १५९ धावांतच आटोपला. ३ मेडनसह २० धावांत ३ विकेट्स पटकावणाऱ्या क्रांती गौडला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. पावसामुळे कोलंबोतल्या आर.प्रेमदासा स्टेडियमवरची खेळपट्टी झाकून ठेवण्यात आली होती. अपेक्षित वेगाने बाऊंड्रीपर्यंत नव्हता पण या अडथळ्यांना पार करत भारतीय संघाने विजय साकारला.

### छोट्या पण उपयुक्त खेळी

भारतीय फलंदाजांपैकी एकीलाही अर्धशतक करता आलं नाही. खेळपट्टी संथ होती. चेंडू बॅटवर नीट येत नव्हता. यामुळे मोठी खेळी साकारणं अवघड होतं. पण भारतीय फलंदाजांनी छोट्या पण उपयुक्त खेळी केल्या. ८ भारतीय फलंदाजांनी दुहेरी धावसंख्या गाठत संघ सन्मानजनक धावसंख्येपर्यंत पोहोचेल याची काळजी घेतली.

## मुनीबा अली वादग्रस्तरित्या झाली आऊट

## पाकिस्तान कर्णधारने पंचांशी वाद घातला; VIDEO व्हायरल

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यात पाक संघाची सलामीवीर मुनीबाच्या विकेटवरून मैदानावर गदारोळ पाहायला मिळाला. महिला वनडे वर्ल्डकप सामन्यात पाकिस्ताननं नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. तर भारताने फलंदाजीत ठराविक अंतराने विकेट्स गमावले असले तरी २४७ धावा केल्या. यानंतर प्रत्युत्तरात पाकिस्तानने सुरूवातीलाच विचित्ररित्या बाद झाली. नेमकं काय घडलं; पाहूया.**




भारतीय संघ प्रथम फलंदाजी करताना २४७ धावांवर सर्वबाद झाला. भारताकडून सर्व फलंदाजांनी ३०-३५ धावांचं योगदान दिलं. पाकिस्तानच्या गोलंदाजीपुढे भारताने ठराविक अंतरावर विकेट्स गमावल्या. पण अखेरच्या षटकांमध्ये ऋचा घोष चौकार-षटकारांचा पाऊस पाडला आणि संघाला २४७ धावांपर्यंत नेऊन पोहोचवलं.भारताने दिलेल्या २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरूवात फारशी चांगली झाली नाही.पहिल्या षटकापासूनच टीम इंडियाच्या गोलंदाजांनी दबाव कायम ठेवला आहे.क्रांती गौडच्या चौथ्या षटकातील अखेरच्या चेंडूवर संघाने पायचीत झाल्याचं अपील केलं.पण चेंडू लेग स्टंपच्या बाहेर तर नाही ना पिच झाला, अशी शंका होती. ऋचाने मात्र बाद असल्याची खात्री दाखवली तरी भारताने रिव्ह्यू घेतला नाही. क्रांतीचा तो चेंडू विकेटच्या मागे गेला आणि दीप्ती शर्माने चेंडू पकडत लगेच स्ट्रायकर एन्डच्या दिशेने थ्रो केला. तेव्हा मुनीबा क्रीजच्या बाहेर होती आणि तिचं लक्ष नव्हतं. दीप्ती शर्माचा थ्रो येऊन सरळ विकेटवर बसला. टीम इंडियाच्या खेळाडूंनी अपील केलं.

### मुनीबाने बॅट क्रीजच्या आत नेली

पण मैदानावरील पंचांनी नाबाद दिलं व तिसऱ्या पंचांची मदत घेतली. रिप्लेमध्ये मुनीबाने बॅट क्रीजच्या आत नेली आणि पुन्हा वर उचलेली दिसली. रनआउट तपासताना लक्षात आलं की चेंडू स्टंपला लागला तेव्हा बॅट हवेत होती आणि शेवटी आउट दिलं गेलं.मुनीबा अलीला धावबाद दिल्यानंतर फातिमा सना चौथ्या पंचाशी बोलताना दिसली.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार।
। दि. 5 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### ब्लड बँक आणि विश्वराज हॉस्पिटल, लोणी काळभोर यांच्यावतीने शिबीर

# 172 रक्तदात्यांनी जपली समाजाप्रती बांधिलकी

## शिक्षण विश्व: एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये रक्तदान शिबिर संपन्न




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अलंदी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन तर्फण ब्लड बँक आणि विश्वराज हॉस्पिटल, लोणी काळभोर यांच्या सहकार्याने करण्यात आले.**

या रक्तदान शिबिरात एकूण १७२ रक्तदात्यांनी सहभाग घेत समाजाप्रती आपली बांधिलकी दर्शविली. महाविद्यालयातील अध्यापन व अशैक्षणिक कर्मचारी, सध्याचे विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शिबिराचे नियोजन व समन्वय उत्कृष्टरीत्या पार पाडले. दात्यांना अल्पोपहार पुरविणे, स्वच्छतेची विशेष काळजी घेणे, रक्तदात्यांचे समुपदेशन करणे, विद्यार्थ्यांना रक्तदानासाठी प्रेरित करणे आणि जनजागृती घडवून आणणे यासाठी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे संचालक प्रा. बी. बी. वाफरे, उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी, डॉ. मानसी आतितकर तसेच विविध विभागप्रमुख उपस्थित होते. त्यांनी स्वयंसेवकांचे मनोबल वाढवत रक्तदात्यांचे अभिनंदन केले.

या शिबिराचे यशस्वी आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अरविंद वागसकर यांनी केले. या उपक्रमाला लाभलेला उदंड प्रतिसाद महाविद्यालयाच्या सामाजिक जाणीव, एकजूट व सेवाभावाचे प्रतीक ठरला.

# अनुकंपा तत्वावरील 19 उमेदवारांना नियुक्ती आदेश

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र आदेश वितरीत करण्याचा कार्यक्रम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य शासनाच्या निर्णयानुसार अनुकंपा नियुक्ती बाबतचे सुधारित सर्व समावेशक धोरण जाहीर करण्यात आले आहे. शासनाच्या १५० दिवस कार्यक्रम अंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र आदेश वितरीत करण्याचा कार्यक्रम मुंबई येथे संपन्न झाला.**



पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात दृकश्राव्य प्रणालीद्वारे जिल्ह्यातील अशा पात्र उमेदवारांना देखील नियुक्ती आदेश देण्यात आले यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १९ उमेदवारांचा समावेश होता. यामध्ये अनुकंपा वारस नियुक्ती १२ उमेदवारांना तर लाड समिती शिफारस वारस नियुक्ती ७ उमेदवारांना नियुक्ती पत्र आदेश वितरीत करण्यात आले.

मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती. तर पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी गजानन पाटील यांच्यासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सह आयुक्त मनोज लोणकर देखील उपस्थित होते.

राज्य शासनाने अनुकंपा उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरणाचा राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये लिपिक पदासाठी अभिजित जाधव, समीक्षा इंदुलकर, सुशांत फलके, व्यंकटेश गोणे, शिपाई पदासाठी दीपक नवले, साहिल काशिद, नयना हुंबरे, संकेत यादव, मजूर पदासाठी गणेश पडवळ, प्रीतम कडलग स्पे कुली पदासाठी मनीष लोहारे, अमृत कांबळे,सफाई कामगार पदासाठी रोहन लोंढे, अर्चना पाथरकर, विशाल वाघमारे, श्रीदेवी गायकवाड, अजिंक्य काळोखे, प्रवीण पोटे, अभिषेक केदारी यांचा समावेश आहे.


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046